क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक विषमतेविरोधात लढण्याची प्रेरणा देईल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 2

नववर्षाला साईचरणी तब्बल २३.२९ कोटींची दान रक्कम >>पान 3

बुलढाण्याचा 'गुगल बॉय' : अडीच वर्षांच्या क्षितिजचा अद्भुत विश्वविक्रम >>पान 4

**सुविचार**


स्वत:ची बेसूर जीवन बासरी सुधारा मग दुसऱ्याच्या जीवन बासऱ्या तुम्ही सुधारू शकाल. - साने गुरुजी

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 149 ■ रविवार, दि. 04 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



शाहरुख खानच्या या निर्णयामुळे देशभरात वाद

आतील पान

# मुंबईतील हायव्होल्टेज लढती

## ठाकरेंची सेना आणि शिंदेंची सेना ६९ जागांवर आमने-सामने, ९७ ठिकाणी भाजप-ठाकरे भिडणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्याचे नव्हे तर अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेच्या हायव्होल्टेज लढती स्पष्ट झाल्या आहेत. मुंबईत ६९ जागांवर ठाकरेंची शिवसेना विरुद्ध शिंदेंची शिवसेना अशी थेट लढत रंगणार आहे. त्याचवेळी भाजप आणि ठाकरेंची शिवसेना ९७ जागांवर एकमेकांशी भिडणार आहे. तर मनसे आणि शिंदेंची शिवसेना फक्त १८ जागांवर आमने-सामने येणार आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेची निवडणूक ही चांगलीच रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.**

ठाकरेंची शिवसेना मुंबईत १६३ जागांवर निवडणूक लढत आहे, तर मनसे ५३ जागांवर निवडणूक लढत आहे. त्याचसोबत शरद पवारांची राष्ट्रवादी ही ११ जागांवर निवडणूक लढणार आहे. दुसरीकडे महायुतीतून भाजप १३७ जागांवर तर एकनाथ शिंदे यांची शिवसेना ९२ जागांवर निवडणूक लढत आहे.

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुका होणार असल्या तरी संपूर्ण देशाचे लक्ष लागलंय ते मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर. मुंबईत गेल्या २५ वर्षांपासून ठाकरेंची सत्ता राहिली आहे. मात्र, शिवसेनेत पडलेली फूट, भाजपाची वाढलेली ताकद आणि मुंबईत वाढलेली लोकसंख्या यामुळे समीकरण बदललं असून यंदाची निवडणूक चांगलीच अटीतटीची ठरण्याचे चित्र आहे.

शुक्रवारी अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर आता मुंबईतील हायव्होल्टेज लढतीही स्पष्ट झाल्या आहेत. त्यानुसार मुंबईतील ६९ जागांवर शिंदे विरुद्ध ठाकरेंमध्ये थेट सामना रंगणार आहे. दुसरीकडे ९७ जागांवर थेट भाजप आणि ठाकरेंची सेना यामध्ये लढत होईल.



यासोबतच भाजप आणि मनसे ३५ जागांवर आमनेसामने आले आहेत, तर शिंदेंच्या शिवसेनेची फक्त १८ जागांवर मनसेविरुद्ध लढत होणार आहे. या लढतींसह भाजप आणि शिंदेंचा प्रत्येकी पाच जागांवर पवारांच्या राष्ट्रवादीशी सामना रंगणार आहे. या निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर लढत आहे. त्यामुळे ही निवडणूक अधिकच रंगतदार होणार आहे.

ठाणे, कल्याण-डोंबिवलीसह राज्यात अनेक ठिकाणी भाजप, शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत आणि त्याची जोरदार चर्चा सध्या सुरू आहे. मात्र हे उमेदवार कसे निवडून आले याची पोलखोल राज ठाकरे हे होणाऱ्या सभांच्या माध्यमातून करणार आहेत. त्याचसंदर्भातले काही कॉल रेकॉर्ड्स, व्हिडीओ आणि अन्य महत्त्वाचे पुरावे मनसे नेत्यांनी राज ठाकरेंकडे सुपूर्द केल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे या महापालिकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराप्रकरणी मनसे आक्रमक झालेली पाहायला मिळत आहे.

## एवढंच राहिले होते! शिक्षकांना आता श्वानांचे सर्वेक्षण करावे लागणार, शिक्षण विभागाच्या नव्या आदेशाने संताप

**मुंबई/प्रतिनिधी :** आधीच विविध शिक्षणाशिवाय अन्य कामांच्या ओझ्याखाली काम करणाऱ्या शिक्षकांवर आता आणखी एक नवी जबाबदारी टाकण्यात आल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नव्या आदेशानुसार प्रत्येक शाळेत एका शिक्षकाची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार असून शाळेच्या परिसरातील स्वच्छतेसोबतच भटक्या कुत्र्यांचा वावर रोखण्याची जबाबदारीही त्या शिक्षकावर सोपवण्यात आली आहे. शिक्षण आयुक्तांनी याबाबत काढलेल्या परिपत्रकाविरोधात राज्यातील विविध शिक्षक संघटनांनी निषेध नोंदवला आहे.

देशभरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असून त्यांच्या हल्ल्यांमध्येही मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाने शैक्षणिक संस्थांचे परिसर स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्याचे निर्देश दिले होते. या आदेशानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व उच्च शिक्षण संस्थांना परिसर स्वच्छता आणि सुरक्षेसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नेमण्याबाबत परिपत्रक जारी केले होते.

यामुळे आता शालेय शिक्षण विभागानेही प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसाठी नवीन परिपत्रक काढले आहे. या परिपत्रकानुसार प्रत्येक शाळेतील एका शिक्षकाची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. या शिक्षकाचे नाव, संपर्क क्रमांक आणि जबाबदारीची माहिती शाळेच्या प्रवेशद्वारावर ठळक अक्षरांत लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच ही माहिती स्थानिक महापालिका, नगरपरिषद किंवा संबंधित यंत्रणेला देणेही आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

शाळेच्या परिसरात भटके कुत्रे येऊ नयेत तेथे त्यांचा मुक्काम किंवा निवारा होऊ नये याची जबाबदारी संबंधित नोडल शिक्षकावर राहणार आहे. मात्र आधीच गणना, निवडणूक कामे, सर्वेक्षण, प्रशासकीय अहवाल यांसारख्या कामांमुळे त्रस्त असलेल्या शिक्षकांवर आणखी अशी जबाबदारी टाकणे अन्यायकारक असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, मात्र त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नेमावी, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे.

## दोन लाखांपर्यंत पीक कर्ज, अन्य शेती व्यवहारावरील मुद्रांक शुल्क माफ; महसूल विभागाचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना शेती आणि पीक कर्जाशी संबंधित २ लाखांपर्यंतच्या व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पूर्णत: माफ करण्यात आले आहे. यासंदर्भात शासन निर्णय महसूल आणि वन विभागाने जारी केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतच्या शेती अथवा पीक कर्जाशी संबंधित निष्पादीत केलेल्या अधिस्वीकृती, रोखपत्र करारनामा, हक्कविलेख निक्षेप, हडप, तारण अथवा तारण गहाण, हमीपत्र गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणखत, गहाणाचे सूचनापत्र किंवा घोषणापत्र किंवा यास संलग्न अशा कोणत्याही संलेखावर उक्त अधिनियमांतर्गत आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत पूर्णत: माफ करत असल्याचे शासन आदेशात म्हटले आहे.

## महायुतीत वादाची ठिणगी? 'आम्हाला दमात अन् हलक्यात घेऊ नका', चंद्रकांत पाटलांचा अजित पवारांना अप्रत्यक्ष इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या प्रचाराच्या निमित्ताने महायुतीच्या नेत्यांमध्येच वादाची ठिणगी पडल्याचं चित्र दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर बोलताना 'पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर भ्रष्टाचाराचा कळस गाठला गेला. स्थानिक नेत्यांची राक्षसी भूक दिसून आली' अशी टीका केली होती. त्यांच्या या टिकेनंतर आता भाजपाच्या नेत्यांकडून अजित पवारांना इशारा देण्यात येत आहे.

अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप असल्याचं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं. त्यानंतर आता भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांनी एका कार्यक्रमात बोलताना अजित पवारांना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. 'आम्हाला दमात आणि हलक्यात घेऊ नका. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देखील आमच्याकडेच आहे', असे म्हणत चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांना सुनावले आहे.

## मनोज जरांगे पाटील यांनी घेतले श्री साई समाधीचे दर्शन






मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी सकाळी शिर्डी येथे येऊन श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर मंदिर प्रमुख श्री. विष्णू थोरात यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

## महाराष्ट्रात बिनविरोध विजयी झालेले जवळपास १०० नगरसेवक अडचणीत? राज्य निवडणूक आयोगाने घेतला मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच निवडणुकीत अत्यंत धक्कादायक प्रकार घडला आहे. निवडणुका होण्याआधीच निकाल लागला आहे. महाराष्ट्रात जवळपास १०० नगरसेवक बिनविरोध निवडूण आले आहेत. या विजयी नगरसेवकांनी ना प्रचार केला, ना यांच्या निवडीसाठी मतदान झाले. एबी फॉर्म भरला आणि हे उमेदवार डायरेक्ट नगरसेवक झाले आहेत. २९ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत भाजपचे ४४, शिवसेना शिंदे २२ नगरसवेक, तर, राष्ट्रवादीचे २ आणि एक अपक्ष उमेदवार बिनविरोध विजयी झाला आहे. या विजयी नगरसेवकांची आता चौकशी होणार आहे.

बिनविरोध उमेदवारांची चौकशी होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने याबाबत मोठा निर्णय घेतला. आयोगानंबिनविरोध उमेदवारांचा अहवाल मागवला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव, प्रलोभन किंवा जबरदस्तीचा वापर झाला का, याबाबत आयोगाने संबंधित महानगरपालिकांकडून सविस्तर अहवाल मागवले आहेत.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी होणार असून मतमोजणी होणार आहे. १६ जानेवारीला निकाला जाहीर होणार आहे. मतदानाआधीच ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत भाजपचे पाच आणि शिवसेनेचे चार उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

# राज ठाकरे करणार महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी पोलखोल, महायुतीच्या ६५ बिनविरोध उमेदवारांविरोधात 'लावरे तो व्हिडिओ'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांमध्ये सत्ताधारी महायुतीचे जवळपास ६५ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मतदान होण्यापूर्वीच विरोधी पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने हा विजय निश्चित झाला. कल्याण-डोंबिवली, ठाणे, जळगाव, पनवेलसारख्या भागांत महायुतीला मोठा फायदा झाला, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. या सर्व घटनेवर राज ठाकरेंनी आश्चर्य व्यक्त केलेय. यावरच न थांबता खास ठाकरे शैलीत ते लाव रे तो व्हिडिओ लावून याची पोलखोल करणार आहेत.

महायुतीचे ६५ उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांनी या घटनेवर आपले मत व्यक्त केले. माझ्या संपूर्ण आयुष्यात मी अशी निवडणूक कधीच पाहिली नाही. बाळासाहेब ठाकरेंबरोबर अनेक निवडणुका अनुभवल्या, पण इतक्या मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध होणे ही पहिलीच वेळ असल्याचे राज ठाकरे म्हणाले. ही परिस्थिती त्यांना नवीन आणि आश्चर्यकारक वाटते.राज ठाकरे हे ठाण्यात बोलत होते. यावेळी मनसेचे शहराध्यक्ष अविनाश जाधव, अभिजीत पानसे आणि माजी आमदार राजू पाटील यांच्यासमोर उपस्थित होते. ठाणे राज ठाकरेंचा बालेकिल्ले मानला जातो, त्यामुळे तेथील राजकीय घडामोडींवर त्यांचे विशेष लक्ष आहे.

**बिनविरोध निवडींचे कारण**

अनेक ठिकाणी विरोधी उमेदवारांनी अचानक अर्ज मागे घेतले. यामागे सत्तेचा दबाव, आर्थिक आमिष किंवा इतर कारणे असू शकतात, असे विरोधकांचे म्हणणे आहे. महायुती मात्र हे जनतेच्या पाठिंब्याचे आणि पक्षाच्या ताकदीचे प्रतीक मानते. राज्य निवडणूक आयोगाने याची चौकशी सुरू केली आहे.

**विरोधकांची नाराजी**

शिवसेना (उबाठा), मनसे आणि इतर विरोधी पक्षांनी यावर तीव्र टीका केली आहे. ते म्हणतात की, लोकशाहीला धोका पोहोचवला जात आहे. पैसे आणि धमकीचा वापर करून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न होत असल्याचे आरोप होत आहेत. संजय राऊत यांनी तर निवडणूक आयोगालाही लक्ष्य केले.

या बिनविरोध विजयांमुळे महायुतीला निवडणुकीत मोठी आघाडी मिळाली आहे. ठाणे, कल्याणसारख्या भागांत ठाकरे बंधूंच्या युतीला धक्का बसला. पण हे प्रकार सामान्य नाहीत आणि यामुळे राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे. ही निवडणूक आता अधिक चुरशीची होणार आहे.



**उमेदवारांची पोलखोल**

ठाणे, कल्याण डोंबिवली सह राज्यात निवडून आलेल्या ६५ महायुतीच्या उमेदवारांच्या विरोधात राज ठाकरे यांच्याकडे पुरावे असल्याचे सांगण्यात आले आहे. येणाऱ्या सभांच्या माध्यमातून राज ठाकरे महायुतीच्या बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांची पोलखोल करणार आहेत. कॉल रेकॉर्ड, व्हिडिओ यांच्यासह अनेक महत्त्वाचे पुरावे राज ठाकरे यांच्याकडे नेत्यांनी सुपूर्त केले.

**मनसे कोर्टात जाणार**

येत्या सोमवारी मनसे या ६५ विनविरोध उमेदवार आणि त्यांच्या जागांबाबत कोर्टात जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.



## पिढी घडविणारा विद्वान कार्यकर्ता

पणजीमधील आमच्या नव्या कार्यालयाच्या पत्त्यावर आलेले ते बहुधा पहिलेच पत्र असावे. छानदार अक्षरात पत्ता लिहिलेले फिकट निळ्या रंगाचे आंतरदेशीय पत्र. मला त्याचीच प्रतिक्षा होती. उत्सुकतेने मी पत्र उघडले आणि वाचले. थोडी निराशाच पदरी पडली. पत्र सरळ घडी केले आणि माझ्या बॅगेत ठेऊन दिले. मी विचारलेल्या व्यवहारिक प्रश्नांना उत्तर म्हणून अशोकरावांनी थेट मला भगवद्गीतेतील एक श्लोक पाठवून त्याचे संक्षिप्त निरुपणच केले होते ! ''स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः'' या भगवद्गीतेतील १८व्या अध्यायातील श्लोकाने सुरुवात केलेले सरांच्या सुवाच्य अक्षरातील ते पत्र डोळ्यांपुढे अगदी आजही लख्ख उभे राहते ! आपण कोणतेही काम करत असू मोठे असो वा लहान -- ते जर पूर्ण निष्ठेने, भक्तिभावाने आणि समर्पण भावनेने केले, तर तेच ध्येयप्राप्तीचे साधन ठरते. कोणतेही कार्य तुच्छ नाही; तेच ईश्वरसेवेचे साधन आहे. अशा आशयाच्या त्या पत्राने मी तेंव्हा खट्टू झालो खरा पण खरे तर आजपर्यंतच्या वाटचालीत कितीतरी वेळा ते आठवले आणि त्या त्या वेळी साचलेले मनावरील मळभ आणि कामाविषयीचे संभ्रम त्याच ओळींनी दूरही झाले ! गोष्ट अगदी साधी होती. खरे तर समस्या अशी काही नव्हतीच. विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ काम करण्यासाठी माझी एम.एस्सी.ची परीक्षा संपताच मी गोव्यात दाखल झालो. काही महिन्यातच तेथील स्थायी कार्यकर्त्यांनी निधी उभारून दादा वैद्य रोडवर परिषदेसाठी एक नवे कार्यालय विकत घेतले. एका मोठ्या अपार्टमेंट मधील या फ्लॅटमध्ये पाण्याची समस्या होती. काही कारणांनी नगरपालिकेच्या पाइपलाइनचे पाणी आमच्या या फ्लॅटमधील कोणत्याच नळांना येत नव्हते आणि त्यासाठी नगरपालिकेत वारंवार जाऊन अर्ज, विनंत्या करण्याचे काम मलाच करावे लागत होते. एकतर पणजीत राहणारा आणि भरपूर वेळ उपलब्ध असणारा असा कोणीही व्यावसायिक, स्थायी कार्यकर्ता गोव्याच्या तेव्हाच्या टीममध्ये नव्हता आणि त्या तुलनेत माझ्याकडे वेळच वेळ होता. शिवाय नगरपालिकेचे कार्यालय आमच्या या नव्या जागेपासून अगदी जवळच होते. पण तरीही आपण पूर्णवेळ कार्यकर्ते आहोत, त्यामुळे अशी व्यवस्थात्मक कामे आपली नाहीत असा एक बालसुलभ अहंकार माझ्या मनात निर्माण झाला होता. आज हसू येते पण वयाच्या चोविशीत असे बरेच गंड मनात असायचे...मी उद्विग्न होऊन तेंव्हा आमचे प्रांतप्रमुख असलेले डॉ. अशोकराव मोडक यांना एक पत्र लिहिले आणि माझी व्यथा थेट त्यांच्यापुढे मांडली ! मला वाटले, सर माझ्या या व्यथेची दखल घेऊन स्थानिक कार्यकर्त्यांना कामाला लावतील आणि मला सांत्वनाचे चार शब्दही लिहितील. पण झाले उलटेच. कोणतेही काम तुच्छ न समजता केले पाहिजे. ते अंततः संघटनेच्या ध्येयाकडेच आपल्याला घेऊन जाते अशा आशयाचा तो श्लोक, ते निरूपण म्हणजे अशा तक्रारी पुन्हा न करण्याची मला दिलेली सौम्यशी तंबीच होती ! सरांचे मला आलेले हे बहुधा पहिलेच पत्र ! पुढे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून दोन-अडीच वर्षे आणि त्या नंतरही थोडा काळ काही तात्कालिक निमित्ताने सरांशी होणारा पत्रव्यवहार कायम राहिला. अभ्यास, लेखन, प्रवास, बैठका यां सर्व व्यापातून वेळ काढून सर आवर्जून प्रत्येक पत्राला सविस्तर उत्तर द्यायचे. त्यांना पत्र पाठवणारा केवळ मीच एकटा नव्हतो. आपल्या मासिक खर्चाचे अयव्यय पत्रक आणि सोबत महिनाभरात आपण काय काम केले, काय अडचणी जाणवल्या याविषयी विस्तृत पत्र प्रत्येक पूर्णवेळ कार्यकर्त्याने प्रांतप्रमुख या नात्याने अशा कार्यकर्त्यांचे पालक असणाऱ्या मोडक सरांना पाठवले पाहिजे हा एक अलिखित दंडकही होता. पण सरांना पाठवल्या गेलेल्या प्रत्येक पत्राचे काळजीपूर्वक वाचन करूनच ते प्रत्येकाला उत्तर देत असत. ही उत्तरे वरवरची नसत. त्यात त्या कार्यकर्त्याला त्याच्या आणि संघटनेच्या विकासासाठी आवश्यक असणारे नेमके मार्गदर्शन असायचे. १९७५ ते १९९५ हा खऱ्या अर्थाने विद्यार्थी परिषदेच्या स्थित्यंतराचा काळ होता. यशवंतराव केळकरांच्या कुशल संघटनशास्त्राच्या आधारे जी सशक्त पायभरणी झाली होती त्यावर विविध आयामांची, संघर्षशील चळवळीची आणि पर्यायाने नेतृत्व निर्माणाची सुडौल रचना उभी राहिली ती याच काळात. स्व.बाळासाहेब आपटे, अशोकराव मोडक आणि अनिरुद्ध देशपांडे यांच्यासारखे धुरीण हे या काळातील बिनीचे शिलेदार ! डॉ.विश्वासराव पाटील आणि डॉ. सर्जेराव ठोंबरे यांसारख्या प्राध्यापकांनी नंतरच्या दशकात हीच परंपरा पुढे चालवली. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेले एकात्म मानव दर्शन हा आज केवळ अभ्यासाचा, भाषणाचा विषय राहिलेला नसून केंद्र आणि अनेक राज्यसरकारांतर्फे राबविल्या जाणाऱ्या कितीतरी कल्याणकारी योजनांचा पायाभूत विचार बनला आहे. अशोकराव हे या विचारांचे साक्षेपी अभ्यासक. त्यांनी या विषयी लिहिलेली पुस्तके त्यांच्या व्यासंगाची साक्ष तर देतातच पण हा वरवर कठीण वाटणारा विषय आणि विचार उलगडवून दाखवताना ते किती सहजतेने मुद्देसूद लिखाण करतात याचाही प्रत्यय येतो. केवळ लिखाणच मुद्देसूद नाही तर भाषणही तसेच. एखादी भूमितीतील आकृती काढावी तसे मोजून, मापून बेतलेले आणि त्यामुळेच प्रभावी आणि परिणामकारक होणारे. आजच्या माझ्या मांडणीचा विषय हा आहे...त्यात मी एकूण इतके मुद्दे मांडणार आहे...पूर्वार्धात त्या सर्व मुद्द्यांची संक्षिप्त जंत्री सांगतो, नंतर उरलेल्या वेळात त्याचे थोडे सविस्तर स्पष्टीकरण देतो आणि शेवटी पुन्हा एकदा सर्वांची उजळणी करून माझे बोलणे मी संपवणार आहे... असे म्हणत त्यांनी अभ्यासवर्गात किंवा जाहीर भाषणांमध्ये आपल्या व्याख्यानाला सुरुवात केली की नकळत आम्ही अनेकजण आपापल्या डायऱ्या आणि पेन सरसावून बसायचो. अशा नोट्स घेणाऱ्यांच्या दृष्टीने अशोकरावांचे भाषण म्हणजे निव्वळ पर्वणीच असायची ! अगदी अलीकडेच दाजीशास्त्री पणशीकरांच्या उपस्थितीत झालेले पार्ले येथील त्यांचे भाषणही त्याला अपवाद नव्हते. मोजका अभिनवेश, मध्येमध्ये साजेशा कोपरखळ्या आणि तुडूंब भरलेला आशय ही त्यांच्या भाषणाची वैशिष्ठ्ये ! संदर्भांची भरपूर रेलचेल. किंबहुना त्याशिवाय ते बोलतच नसत.जवळ त्यांच्या स्वतःच्या टिपणांच्या फुलस्केप कागदांची चळत असायचीच. छानदार लकबीने मान हलवत ते त्यांच्या मांडणीतील महत्वाच्या मुद्द्यांना संदर्भांची जोड द्यायचे. अमुक अमुक यांनी लिहिलेले, इतक्या साली प्रकाशित झालेले हे पुस्तक, त्यातील पृष्ठ क्रमांक हा आणि त्यातील हा उल्लेख.... असे ते जेव्हा सांगत तेंव्हा अनेकदा मी ते लिहून घेतले आहे आणि चक्क पडताळूनही पाहिलेले आहे ! धुळे येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांचा संघ, विद्यार्थी परिषदेशी असणारा संपर्क अधिक गतिमान झाला. त्याच दरम्यान एकदा पंडित दीनदयाळ उपाध्याय हे जनसंघाच्या कार्यक्रमासाठी धुळे येथे येणार असल्याची बातमी त्यांना समजली आणि आपल्या महाविद्यालयात त्यांचे व्याख्यान ठेवण्याची संधी त्यांनी व्यवस्थापनाशी संघर्ष करून साधली. प्राचार्य नानासाहेब वैद्य हे वेगळ्या विचारधारेचे. त्यांनी प्रथम पंडितजींच्या व्याख्यानाला परवानगी नाकारली. होकार मिळवण्यासाठी आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला. अखेर सातशे विद्यार्थ्यांसमोर पंडितजींचे भारतीय संस्कृती और समाजवाद या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. ते इतके परिणामकारक आणि प्रभावी झाले की खुद्द प्राचार्यांनीच पुढे येत या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले. एका अभ्यासू कार्यकर्त्याच्या सामाजिक कार्याची सुरुवातच अशी संघर्षातून झाल्याने आपल्या हक्कांसाठी विद्यार्थ्यांना कराव्या लागणाऱ्या आंदोलनांचे मोल त्यांनी जाणले आणि वेळोवेळी सर्वांपुढे आग्रहाने मांडले देखील !

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक विषमतेविरोधात लढण्याची प्रेरणा देईल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव येथे उभ्या राहणारे उचित स्मारक हे त्यांच्या कार्याची आठवण देईल, त्यामुळे लढण्याची प्रेरणा तर मिळेलच परंतु समाजातील विषमतेच्या विरोधात क्रांतीची बिजे तयार होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महिलांना अधिकारिता देण्यासाठी, त्यांना सक्षम करण्यासाठी येथे उभ्या राहणाऱ्या महिला प्रशिक्षण केंद्रात आवश्यक सर्व प्रकारच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

नायगाव (ता. खंडाळा) येथे आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या १४३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या भव्य स्मारकाचे भूमिपूजन तसेच महिला प्रशिक्षण केंद्राचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे, सचिन पाटील, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नायगावच्या सरपंच स्वाती जमदाडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रात आणि देशात स्त्री शिक्षणाची सुरुवात केली, स्त्रीयांना गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त केले त्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे भूमिपूजन करण्याची संधी मिळाली हे आपले भाग्य समजतो, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजातील अनिष्ट रुढीवादाच्या विरोधात क्रांतीचे रणशिंग फुंकले आणि समाजामध्ये समता तयार करण्याकरता एक मोठी व्यवस्था उभी केली.

श्री. फडणवीस म्हणाले, आपल्या समाजात जेव्हा जेव्हा रूढीवाद, विषमता, जातिवाद वाढला त्या त्यावेळी आपण सामाजिक आर्थिक गुलामगिरीत गेलो. अशा जातीपातीत विभागलेल्या समाजात उच्च- नीच पणाची भावना रुजविण्याचा प्रयत्न होता. अशा परिस्थितीत सर्वाधिक वाईट स्थिती महिलांची होते. कुठल्याही समाजातील महिलांना अत्यंत हीन प्रकारची वागणूक देण्याची रूढी होती. शिक्षणाचा अधिकार नव्हता, विधवांना संपत्तीचा अधिकार नव्हता. अशा स्थितीत त्यांनी समाजातील रुढींच्या विरोधात बंड पुकारले आणि महिलांना शिक्षणाचा अधिकार देण्यासाठी पहिली मुलींची शाळा सुरू केली.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, हे शासन महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांच्या मार्गाने चालण्याचे काम करेल, त्यामुळेच आम्ही मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याच्या योजनेला सावित्रीबाई फुले यांचे नाव दिले. महात्मा फुले यांनी समाजाला मोकळा श्वास देण्याचे काम केले. त्या अनुषंगाने मोफत उपचार देण्याच्या जन आरोग्य योजनेला महात्मा फुले यांचे नाव दिले, असेही ते म्हणाले.

शासनाने लाडक्या बहिणींना केवळ लाडक्या बहिणी न ठेवता लखपती दिदी बनविण्याच्या घेतलेल्या



निर्णयानुसार आतापर्यंत ५० लाख लखपती दीदी झाल्या असून यावर्षी १ कोटीपर्यंत पोहोचू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सातारा जिल्ह्यात दीड लाख लखपती दीदी झाल्या आहेत याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. संत सावता माळी यांचे अरण येथील स्मारकही भव्य दिव्य करण्यात येईल. त्यासाठी आवश्यक त्या व्यवस्था उभ्या करण्यात येत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

नायगावचे नाव सावित्रीबाई फुले यांच्या नावाने करण्याची मागणी यावेळी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली. त्या अनुषंगाने ग्रामसभेने तसा निर्णय घेऊन ग्राम विकास विभागामार्फत पाठवल्यास त्याला विनाविलंब मान्यता देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. भुजबळ म्हणाले, १९९३ साली नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांच्या जन्म झालेल्या वाड्याचा शोध घेतला. त्याचा शेजारील घरांप्रमाणे विकास व्हावा म्हणून वास्तुविशारद शोधून काम केले. त्यावेळी निधीची उभारणी करून घर आणि स्मारक उभे राहिले. त्यावेळी पंचवीस तीस लाख उभे करण्याला अडचण येत होती. पण आज मुख्यमंत्र्यांनी १४३ कोटी रुपये दिले, त्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. पुण्याच्या फुले वडाच्या रेंगाळलेल्या कामाला गती देण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले. ११ एप्रिल २०२७ ला महात्मा फुलें यांची २०० वी जयंती असून ती देशभर साजरी करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे. त्या अनुषंगाने राज्यातही साजरी करत असतानाच मुंबई येथे कलिना येथे इंडिया बुल्सच्या मागे एक आंतरराष्ट्रीय ग्रंथालय उभे करण्याचे यापूर्वी निश्चित केले होते. त्या अनुषंगाने इमारत उभी राहिली असून ग्रंथालयाचे कामही व्हावे, असेही त्यांनी नमूद केले.

ग्रामविकास मंत्री श्री. गोरे म्हणाले, सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक उभे राहावे या अनुषंगाने गतीने पाठपुरावा केला. मुख्यमंत्र्यांनी १४३ कोटी रुपयांच्या आराखड्याला मान्यता दिली असून ११० कोटी मंजूर झाले आहेत. येथील महिला प्रशिक्षण केंद्रासाठी अजून ५० कोटी रुपयांची गरज आहे. तसेच शेजारील पर्यटन विभागाची २ एकर जागाही या कामासाठी हस्तांतरित होणे आवश्यक असल्याचे, ते म्हणाले.

महात्मा फुले यांचे मूळ गाव कटगुण येथेही छोटे स्मारक असून तेथे ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून त्यांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेत आहोत, असेही ते म्हणाले.

मंत्री मकरंद पाटील म्हणाले, सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांचे कार्य आपण शब्दामध्ये सांगू शकत नाही. त्या काळी समाजामध्ये प्रचंड दरी, शिक्षणाचा अभाव, अज्ञान, भेदभाव, अनिष्ट रूढी असताना त्यांनी १९४८ साली पहिली मुलींची शाळा सुरू करून क्रांती केली. नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांच्या १४३ कोटी रुपयांच्या स्मारकाचे भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते होत आहे याचा आनंद होत आहे. ग्रामीण महाराष्ट्रात क्रांतिज्योतींच्या नावाला साजेसे शैक्षणिक संकुल येथे उभे राहावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविक सरपंच स्वाती जमदाडे यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्र्यांसह अन्य मान्यवरांनी महिला स्वयंसहाय्यता समुहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शन व विक्री दालनांना भेट दिली.

कार्यक्रमात नियोजित सावित्रीबाई फुले स्मारक संकल्पन चित्रफीत दाखविण्यात आली.

कार्यक्रमाला माजी आमदार राम सातपुते, बळीराम सीरस्कार, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी आदी उपस्थित होते.

## निवडणूक आयोगाने जनाची नाही तर मनाची तरी बाळगून राहुल नार्वेकरांवर कारवाई करावी: हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकरांचे वर्तन गुंड, मवाल्यासारखे, ते स्वत:ला संविधानापेक्षा मोठे समजायला लागले.

कुख्यात गुंड निलेश घायवळ प्रकरणी अजित पवारांचा खुलासा अत्यंत गंभीर, घायवळला मदत करणाऱ्या केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळांचा तात्काळ राजीनामा घेऊन सीबीआय चौकशी करा.

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पदाचा गैरवापर करत केलेले वर्तन हा आदर्श आचारसंहितेचा भंगच आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज नष्ट केले आहे. निवडणूक आयोग प्रामाणिक नाही हे दिसत आहे. निवडणूक आयोगाने जनाची नाही तर मनाची तरी बाळगून आतापर्यत गुन्हा दाखल करायला हवा होता, पण आयोग हा भाजपाच्या दावणीला बांधलेला आहे हे पुन्हा अधोरेखित होत आहे, असे कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, विधानसभा अध्यक्ष, विधान परिषदेचे सभापती, लोकसभा अध्यक्ष, राज्यसभा सभापती, राज्यपाल यांनी अराजकीय भूमिका घ्यायची असते, ते एका अत्यंत महत्वाच्या संवैधानिक पदावर असतात. पण राहुल नार्वेकर हे गुंड, मवाल्यासारखे वागले, विरोधी पक्षाच्या व्यक्तीला दमदाटी केली, त्यांची देहबोली, वर्तन व दमदाटी ही अत्यंत खालच्या पातळीवरची होती, ही शोकांतिका आहे. आपल्या कुटुंबातील व्यक्ती अविरोध निवडून यावेत यासाठी ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा दरवाजा अडवून थांबले होते, विरोधकांना अर्ज भरू न देणे हे त्यांचे वर्तन अशोभनीय असून त्यांनी पदाचा गैरवापर केला आहे.

# हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आरंभता की अरदास कार्यक्रम नांदेड येथे पार पडला

## ''हिंद-दी-चादर'' कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो लोकांपर्यंत गौरवशाली इतिहास पोहचणार

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित उपक्रमाचा 'आरंभता की अरदास' हा विधी आज नांदेड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी मुख्य कार्यक्रमाच्या मंडपाचे भूमीपूजन तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाराचे पंचप्यारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकि, भगत नामदेव संप्रदाय व उदासीन संप्रदाय या समाजातील संतांची उपस्थिती लाभली होती.

''हिंद-दी-चादर'' कार्यक्रमाचा औपचारिक प्रारंभ तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अबचलनगर नांदेडचे मुख्य जथ्थेदार संत बाबा कुलवंत सिंगजी यांच्यासह भाई जोसिंदर सिंगजी, भाई राम सिंगजी,





भाई कश्मीर सिंगजी, भाई गुरमीत सिंगजी तसेच गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंगजी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी विधान परिषदेचे सदस्य बाबुसिंग महाराज (पोहरादेवी), जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, तहसीलदार संजय वारकड, ३५० वा शहीदी समागम समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, महंत सुनिल महाराज, महंत जितेंद्र महाराज, क्षेत्रीय समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, सरजीत सिंग गिल, क्षेत्रीय समितीचे पदाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे सदस्य उपस्थित होते.

समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहादतीचा गौरवशाली इतिहास समाजासमोर मांडण्यात येणार आहे. अल्पसंख्यांक विकास विभाग आणि नऊ समाजांच्या संयुक्त सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, यापूर्वी ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे हा कार्यक्रम भव्य स्वरूपात संपन्न झाला आहे. त्याच धर्तीवर नांदेडमध्येही हा ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतरही श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग यांनी राज्यात नागपूर येथे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून नांदेड व नवी मुंबई येथेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याबद्दल शासनाचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाचे स्मरण करण्यात येणार असून गौरवशाली इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, रविवार २५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक नियोजन व पूर्वतयारीला गती देण्यात आली आहे. सुरक्षा, वाहतूक व कार्यक्रमस्थळ व्यवस्थापनाबाबत सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या असून यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे समन्वयक रामेश्वर नाईक, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शासकीय समितीतील अधिकाऱ्यांना सोपविलेल्या कामाचा आढावा घेतला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नववर्षाला साईचरणी तब्बल २३.२९ कोटींची दान रक्कम

## ७० बिनविरोध निवडीवरुन संजय राऊतांचा हल्लाबोल; चंद्रशेखर बावनकुळेंचा पलटवार, सांगितले राज'कारण'



**दैनिक आपला विदर्भ**

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** राज्यात निवडणुकीचा बिनविरोध पॅटर्न नव्याने सुरू झाला असून महापालिका निवडणुकांमध्ये तब्बल ७० नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. या बिनविरोध निवडीवरुन विरोधकांनी सरकारवर, राज्यकर्त्यांवर गंभीर आरोप केले असून निवडणूक आयोगानेही याची दखल घेतली आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांनी राज्यकर्त्यांवर टीका केली होती. या देशात अटलबिहारी वाजपेयींपासून ते नरेंद्र मोदींपर्यंत कुणीही बिनविरोध निवडून आले नाहीत, असे उदाहरणही संजय राऊत यांनी दिले होते. आता, भाजप नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संजय राऊतांच्या टीकेवरुन पलटवार केला आहे. तसेच, देवेंद्र फडणवीसाचे सरकारच आमचा विकास करू शकते, या अजेंड्यावर फॉर्म वापस झाले आहेत, असेही बावनकुळे यांनी म्हटले.

संजय राऊत हे नकारात्मक मानसिकतेचे आहेत, ते समाजात नकारात्मक गोष्टी पसरवत असतात. दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणूक अधिकाऱ्यांच्या ऑफिस आवारात जे उमेदवार येतात, त्या सर्वांचे अर्ज स्वीकारण्याची पद्धत आहे. देवेंद्र फडणवीसाचं सरकारच आमचा विकास करू शकते, या अजेंड्यावर फॉर्म वापस झाले आहेत, कोणी कोणावर दबाव टाकू शकत नाही, अशी प्रतिक्रिया चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

या देशात मोठ्या मोठ्या नेत्यांना बिनविरोध निवडून दिलेलं नाही. अटल बिहारी वाजपेयी बिनविरोध निवडून आले नाहीत, बॅरिस्टर नाथ पै कधी बिनविरोध निवडून आले नाहीत, वसंत दादा पाटील बिनविरोध निवडून आले नाहीत, राम मनोहर लोहिया बिनविरोध निवडून आले नाहीत, नरेंद्र मोदी बिनविरोध निवडून आले नाहीत. मात्र, या महाराष्ट्रात बिनविरोध निवडून आणण्यासाठी साम, दाम दंड भेद वापरून नवीन ट्रेंड सुरू असल्याचा घणाघाती प्रहार संजय राऊत यांनी केला. देशाच्या नव्हे तर जगाच्या इतिहासामध्ये इतके बिनविरोध लोक कधी निवडून आले नव्हते हे पत्रकारांना आणि राजकीय विषकांना माहिती आहे आणि लोकांनाही माहिती असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले होते.


राज ठाकरेंच्या सभेतून होणार पोलखोल

ठाणे, कल्याण डोंबिवली, पनवेलसह राज्यात निवडून आलेल्या ७० बिनविरोध निवडून उमेदवारांची सध्या राज्यभर जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामध्ये, सर्वाधिक भाजपचेच आहेत. दबाव, पैशाचं आमिष दाखवून उमेदवारांना निवडणुकीतून माघार घ्यायला लावल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे ठाण्यात मनसेच्या एका उमेदवारानेही निवडणुकीतून माघार घेतल्याने मनसैनिकांना हा मोठा धक्का होता, त्यामुळे बिनविरोध झालेले हे उमेदवार कसे निवडून आले आहेत? याची पोलखोल येणाऱ्या सभांच्या माध्यमातून राज ठाकरे करणार आहेत.

**दैनिक आपला विदर्भ**

**शिर्डी/प्रतिनिधी :** नाताळ सुट्टी, सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त शिर्डी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने २५ डिसेंबर २०२५ ते ०२ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या शिर्डी महोत्सवादरम्यान साईचरणी मोठ्या प्रमाणावर दान प्राप्त झाले. या कालावधीत तब्बल २३ कोटी २९ लाख २३ हजार ३७३ रुपये इतकी दानरक्कम संस्थानला प्राप्त झाल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से.) यांनी दिली.

या नऊ दिवसांच्या कालावधीत सुमारे ८ लाखांहून अधिक साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दानपेटीतून ६ कोटी ०२ लाख ६१ हजार ००६ रुपये, देणगी काउंटरद्वारे ३ कोटी २२ लाख ४३ हजार ३८८ रुपये, पी.आर.ओ. सशुल्क पासद्वारे २ कोटी ४२ लाख ६० हजार रुपये, तर डेबिट-क्रेडिट कार्ड, ऑनलाईन देणगी, चेक/डीडी व मनीऑर्डरद्वारे १० कोटी १८ लाख ८६ हजार ९५५ रुपये देणगी प्राप्त झाली. तसेच २६ देशांच्या परकीय चलनातून १६ लाख ८३ हजार ६७३ रुपये दान मिळाले.







याशिवाय, सोन्याची २९३.९१० ग्रॅम वजनाची दागिने (अंदाजे किंमत ३६ लाख ३८ हजार ६१० रुपये) व चांदीची ५ किलो ९८३ ग्रॅम (किंमत ९ लाख ४९ हजार ७४१ रुपये) देणगी प्राप्त झाली. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी श्री साईबाबांच्या चरणी ६५५ ग्रॅम वजनाचा सुवर्ण-हिरा जडीत आकर्षक मुकुट अर्पण करण्यात आला. या मुकुटाची अंदाजे किंमत ८० लाख रुपये असून त्यामध्ये सुमारे ५८५ ग्रॅम शुद्ध सोने व १५३ कॅरेट मौल्यवान हिरे आहेत.

दरम्यान, या कालावधीत श्री साईप्रसादालयात ६ लाखांहून अधिक भक्तांनी मोफत प्रसाद भोजनाचा लाभ घेतला. तसेच १ लाख ०९ हजारांहून अधिक भक्तांना अन्नपाकीटे वितरित करण्यात आली. ७ लाख ६७ हजार ४४४ लाडू प्रसाद पाकिटांची विक्री करून २ कोटी ३० लाख २३ हजार ३२० रुपये उत्पन्न मिळाले. याशिवाय ५ लाख ७६ हजार ४०० भक्तांनी मोफत बुंदी प्रसादाचा लाभ घेतला.

प्राप्त झालेल्या दानाचा विनियोग श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईप्रसादालयातील मोफत भोजन योजना, संस्थानच्या शैक्षणिक संस्था, गरजू रुग्णांसाठी चॅरिटी, भाविकांच्या सुविधा तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी करण्यात येत असल्याचे गाडीलकर यांनी स्पष्ट केले.

गोरक्ष गाडीलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिर्डी श्री साईबाबा संस्थान

## 'भाजपाचा खरा चेहरा अजित पवार यांनी उघडकीस आणला'; नाना पटोले यांची टीका, बिनविरोध निवडीवरही केले भाष्य

**शिर्डी/प्रतिनिधी :** नवीन वर्ष महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी, तरुणांसाठी आणि गोरगरीबांसाठी सुखाचे आणि समृद्धीचे जावे तसेच काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात आणि देशात सत्ता मिळावी, असे साकडे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी साईबाबांच्या चरणी घातले. यावेळी बोलताना त्यांनी भाजपावर जोरदार टीका केली.

नाना पटोले यांनी घेतले साईदर्शन - काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी आज शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. साई दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, ''स्थानिक निवडणुका या स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांच्या विचाराने लढल्या जातात. त्यामुळे महायुतीची स्वबळावर लढण्याची परिस्थिती आहे. त्यामुळं महाविकास आघाडीत वेगळे काही चित्र राहील असं मला वाटत नाही.''

आम्ही सर्वधर्म समभावाला मानणारे लोक - ''आम्ही संविधानाला मानणारे लोक आहोत. सर्वधर्म समभावाला मानणारे लोक आहोत. महाराष्ट्रात शाहू-फुले यांचा सर्वसमभावचा विचार होता. त्याच महाराष्ट्रात आम्ही राहतोय. त्यामुळं भाषा वाद, धर्म वाद हा विषय होऊ शकत नाही. काही लोक असे प्रकार करत असतील तर तो त्यांचा विषय आहे, असंही नाना पटोले यांनी सांगितले.

भाजपाचा खरा चेहरा उघड - ''उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सिद्ध केलं की, भाजपा किती मोठा भ्रष्टाचारी पक्ष आहे. कालपर्यंत आम्ही आरोप करत होतो की, ७० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करणारे अजित पवार आहेत. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना सत्तेत घेतले. उपमुख्यमंत्री केले आणि अर्थमंत्री करून राज्याच्या तिजोरीची चावी पवारांच्या हातात दिली. 'तुम्ही पैसे लुटा' अशा पद्धतीने भाजपाचा खरा चेहरा अजित पवारांनी आज उघडकीस आणला,'' अशी टीका यावेळी नाना पटोले यांनी भाजपावर केली.

महानगरपालिका निवडणूक लागण्याआधीच महायुतीचे ६७ उमेदवार बिनविरोध निवडून येत असल्याबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले की, ''या प्रकरणी निवडणूक आयोगानं चौकशी सुरू केली आहे. यामध्ये कशा तक्रारी झाल्या आणि दबावतंत्र वापरले गेले हे आपण महाराष्ट्रात पाहतोय. उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा यासाठी गुन्हे दाखल झाल्याचे प्रकारही समोर आले आहेत. महाराष्ट्राचे विद्रुपीकरण करण्याचं काम भाजपा करत असून ते महाराष्ट्रासाठी भूषणावह नाही.''

भाजपा गुंडांचा पक्ष - पुणे महानगरपालिका निवडणुकीत भाजपाकडून गुन्हेगारांना तिकीट देण्यात आल्याबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले की, ''भाजपा हा गुंडांचा पक्ष झाला आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे सरकार असो किंवा राज्यातील भाजपा सरकार असो. यात सगळे गुंड भरले आहेत. हे आपल्याला अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे.''

# शाहरुख खानच्या या निर्णयामुळे देशभरात वाद

## राजकीय आणि सामाजिक संघटनांच्या टोकाच्या प्रतिक्रिया

**दैनिक आपला विदर्भ**


**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा सुपरस्टार शाहरुख खान सध्या मोठ्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. एका निर्णयामुळे देशभरातून त्याच्यावर टीकेची झोड उठवली जात असून, काही संघटनांकडून तीव्र आंदोलन आणि आक्षेपार्ह वक्तव्येही केली जात आहेत. बांगलादेशात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर शाहरुख खानविरोधात संतापाची लाट उसळल्याचं चित्र आहे.

बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या कथित अत्याचारांमुळे देशात आधीच तीव्र भावना आहेत. अशा परिस्थितीत शाहरुख खानने आपल्या आयपीएल संघासाठी बांगलादेशी क्रिकेटपटूची निवड केल्याचा आरोप केला जात असून, त्याच निर्णयामुळे हा वाद अधिक चिघळला आहे. काही जणांनी शाहरुख खानवर देशविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप करत त्याला गद्दार ठरवण्याचा प्रयत्न केला आहे.

मेरठच्या दौराळा भागात आयोजित अटल स्मृती संमेलनात बोलताना भाजप नेते संगीत सोम यांनी शाहरुख खानवर गंभीर आरोप केले. आयपीएलमध्ये बांगलादेशी क्रिकेटपटूला कोट्यवधी रुपयांना खरेदी करणं हे देशविरोधी कृत्य असल्याचं त्यांनी म्हटलं. अशा लोकांना देशात राहण्याचा अधिकार नसल्याचा दावाही त्यांनी केला. बॉलिवूड आणि क्रिकेटच्या माध्यमातून देशविरोधी शक्तींना प्रोत्साहन दिलं जात असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

दरम्यान, अखिल भारतीय हिंदू महासभेनेही शाहरुख खानच्या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला आहे. शाहरुख खानने आपल्या आयपीएल संघात बांगलादेशी खेळाडूचा समावेश केल्यामुळे लोकांच्या भावना दुखावल्या गेल्याचं संघटनेचं म्हणणं आहे. या निषेधादरम्यान काही ठिकाणी अत्यंत आक्षेपार्ह आणि टोकाच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या.

आग्रा येथील हिंदू महासभेच्या जिल्हाध्यक्ष मीरा राठोड यांनी केलेलं वक्तव्य विशेष चर्चेत आलं आहे. त्यांनी शाहरुख खानवर गंभीर आरोप करत अत्यंत आक्षेपार्ह विधान केलं, ज्यामुळे नव्या वादाला



तोंड फुटलं आहे. या वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळातही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

याच प्रकरणात दिनेश फलाहारी महाराज यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून शाहरुख खानवर आरोप केले आहेत. शाहरुख खानला बांगलादेशातील परिस्थितीची माहिती असूनही त्याने बांगलादेशी खेळाडूला मोठ्या रकमेवर विकत घेतल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच, शाहरुख खानचे बांगलादेशातील काही कट्टर घटकांशी संबंध असू शकतात, असा आरोपही या पत्रात करण्यात आला आहे.

या आरोपांमुळे संपूर्ण प्रकरण अधिक गंभीर होत चाललं आहे.

दरम्यान, या सर्व घडामोडींवर शाहरुख खान किंवा त्याच्या व्यवस्थापनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र या वादामुळे सोशल मीडियावर तीव्र चर्चा सुरू असून, समर्थन आणि विरोध अशा दोन्ही बाजूंनी प्रतिक्रिया येत आहेत.


## शब्दकोडे क्र. 53

आडवे शब्द

१. '... दादा मला एक वहिनी अण' १०. विशेष १२. रात्रीचा पाऊस १३. उमर १४. वस्त्र, कापड १६. शेतकरी १७. युवती १८. बरगडी १९. घट्ट २१. घरातील वरचा भाग २२. कारभार, नस्ता उद्योग! २३. गाय २४. गोष्टीतील वनमानव (इंग्रेजी) २६. दगड, लाकूड यांचा पातळ २७. जनावर, माणूस इ. २८. पोशाख (अनेक वचन) ३०. वृद्धत्व, म्हतारपण ३१. जोराचा रट्टा ३२. पादत्राण ३४. पिशाच, वेडा मनुष्य ३६. बारीक झिणझिण ३८. अपऱ्या नाकाचा ४०. अविवेकी, अतिरेकी कृत्य ४१. दिखाऊ, वरवर ४२. पुरुष ४३. पाणी उकळण्याचा आवाज ४६. शिष्य ४८. बाजेची कापडी पट्टी ४९. घटस्फोट ५१. रोखलेली नजर ५२. मलई ५३. तफावत, अंतर ५५. पारंब्याचा एक वृक्ष ५६. शुल्क ५७. जेमतेम ५९. आश्चर्य ६१. लज्जास्पद ६२. अभिनेता ६३. हयगय, दुर्लक्ष ६४. नंतर ६५. च्या बरोबर ६७. भीमाजवळचे शास्त्र ६८. एक कालवण ६९. सहाय्यक ७१. मरणारा, प्रतिस्पर्धी ७२. महाभारतातील वास्तुशास्त्रज्ञ ७३. आपला नसलेला ७४. राजवाड्यातील दालन ७५. सोंग वठवणारा ७६. पद्धतीप्रमाणे ७७. बांबू

उभे शब्द

१. गौर वर्णाचा २. पद्धत ३. पणजीचे राज्य ४. पर्जन्यकाळ ५. डोळे ६. अत्यंत किंमतीची, मौल्यवान ७. पाताळ ८. सौन्याच्या मुक्कामाची जागा ९. शीर, धमनी ११. सर्वत्र, चोहीकडे १५. फायदा, तोटा १६. कमीत कमी १९. भांडण २०. गरजू २२. मेहरबानी २५. पाण्याचा उगम २६. केस २७. जीव २९. झटकम ३२. जुजबी ३३. अधाशी, लालची ३५. चालत चालत ३७. चुनखडीचा दगड ३९. वात्रट, चावट ४३. जाडसर पीठ ४४. शेंगेवरील साल ४५. शेवट, अखेर ४६. कैद ४७. हानी, तोटा करणारे ४८. नेत्रकटाक्ष ५०. कट्टर ५४. भांडण, खोडी ५८. केसांची लट ६०. माराची उमटलेली खूण ६३. नाविक दल ६४. कैफी, नशा आणणारे ६५. फटाक्याची माळ ६६. उगीच ६७. जाणे, प्रस्थान करणे ६९. जळलेला, करपलेला भाग ७०. युद्ध ७१. धनी ७३. पान



### शब्दकोडे क्र. 52 चे उत्तर

आडवे उत्तर

१.गोरी गोरी पान फुलासारखी छान १०.खास १२.रातवा १३.वय १४.वसन १६.किसान १७.तरुणी १८.फासळी १९.तग २१.माळा २२.उलाढाल २३.धेनु २४.टारझन २६.कपची २७.प्राणी २८.कपडे ३०.जरा ३१.कचका ३२.वहाण ३४.पिसाट ३६.रवरव ३८.नकटा ४०.आततायीपणा ४१.नवार ४९.फारकत ५१.टक ५२.साय ५३.फरक ५५.वड ५६.फी ५७.कसाबसा ५९.नवल ६१.लाजिरवाणे ६२.वरण ६२.नट ६३.आबाळ ६४.मग ६५.सह ६७.गदा ६८.वरण ६९.मदतनीस ७१.मारक ७२.परका ७४.महाल ७५.नकलाकार ७६.रीतसर ७७.कळक

उभे उत्तर

१.गोरा २.रीत ३.गोवा ४.पावसाळा ५.नयन ६.लाखमोलाची ७.रसातल ८.छावणी ९.नस ११.सगळीकडे १५.नफानुकसान १६.किमान १९.तंटा २०.गरजवंत २२.उपकार २५.झरा २६.कच २७.प्राण २९.पटकन ३२.वरवर ३३.हावरट ३५.पायीपायी ३७.संगमरवर ३९.टारगट ४३.अटक ४७.नुकसानदायक ४८.नयनबाण ५०.कडवा ५४.कलागत ५८.बट ६०.वळ ६३.आरमार ६४.मदकारी ६५.सर ६६.हकनाक ६७.गमन ६९.मर ७०.समर ७१.मालक ७३.पर्ण

# बुलढाण्याचा 'गुगल बॉय' : अडीच वर्षांच्या क्षितिजचा अद्भुत विश्वविक्रम

## अवघ्या २ मिनिटे ३० सेकंदांत ७१ देशांच्या राजधानी; 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये सुवर्ण नोंद

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/कार्यालय प्रतिनिधी :** अवघ्या अडीच वर्षांच्या बालवयात अफाट बुद्धिमत्ता, संगणकाच्या वेगालाही मागे टाकणारी स्मरणशक्ती आणि विलक्षण आत्मविश्वास यांचा संगम साधत मेहेकर तालुक्यातील डोणगाव येथील चिमुकला चि. क्षितिज विशाल बाजड याने बुलढाणा जिल्ह्याचा नावलौकिक थेट देशपातळीवर पोहोचवला आहे.

केवळ २ वर्षे ८ महिने वयाच्या क्षितिजने २ मिनिटे ३० सेकंदांत जगातील ७१ देशांच्या राजधानींची अचूक नावे सलग सांगून प्रतिष्ठित *'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'*मध्ये आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. ज्या वयात मुले बोलण्याची सुरुवात करतात, त्या वयात संपूर्ण जगाचा नकाशा, देश आणि त्यांच्या राजधानी तोंडपाठ असणे ही बाब दुर्मीळ असून क्षितिजची कामगिरी सर्वांनाच थक्क करणारी ठरली आहे. लहान वय, मोठा पराक्रम क्षितिजने कोणताही खंड न पडता, अचूक उच्चारांसह आणि आत्मविश्वासाने ७१ देशांच्या राजधानी सांगितल्या. ही कामगिरी









ठराविक वेळेत, अधिकृत निरीक्षकांच्या उपस्थितीत पार पडली. याची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌र्स संस्थेने क्षितिजला अधिकृत प्रमाणपत्र, सुवर्णपदक व सन्मानचिन्ह देऊन गौरविले. या विक्रमामुळे क्षितिज केवळ जिल्ह्याचा नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचा अभिमान बनला आहे.

**तज्ज्ञही थक्क**

बालमानसशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञांच्या मते, इतक्या लहान वयात स्मरणशक्तीचा हा स्तर अत्यंत दुर्मीळ आहे. माहिती लक्षात ठेवण्याची क्षमता, तिचे क्रमबद्ध सादरीकरण आणि आत्मविश्वास यामुळे क्षितिजची बुद्धिमत्ता इतरांपेक्षा वेगळी ठरते. त्यामुळे अनेकांनी त्याला भविष्यातील 'गुगल बॉय' म्हणून गौरवले आहे.

**पालकांची दूरदृष्टी ठरली यशाची गुरुकिल्ली**

क्षितिजच्या या यशामागे त्याचे आई-वडील सौ. सोनाली बाजड व श्री. विशाल बाजड यांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांनी मुलातील सुप्त गुण लवकर ओळखले. अभ्यासाचा ताण न देता, खेळाच्या माध्यमातून, चित्रे, रंगीत नकाशे, फ्लॅश कार्ड्‌स, प्रश्नोत्तर खेळ अशा रंजक पद्धतीने माहिती देण्यास सुरुवात केली.

आई-वडिलांच्या संयमित मार्गदर्शनामुळे क्षितिजने कमी कालावधीतच देश व राजधानी सहजपणे आत्मसात केल्या. ''मुलावर दबाव न आणता, त्याच्या कुतूहलाला योग्य दिशा दिल्यास असे यश शक्य होते,'' असे मत पालकांनी व्यक्त केले.

**ग्रामीण भागातील प्रतिभेला** मिळाली **ओळख**

डोणगावसारख्या ग्रामीण भागातून आलेल्या या चिमुकल्याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. ग्रामीण भागातही योग्य वातावरण, प्रोत्साहन आणि पालकांचे मार्गदर्शन मिळाल्यास जागतिक स्तरावर कामगिरी करता येते, हे क्षितिजने सिद्ध केले आहे. सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव क्षितिजच्या विक्रमाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी क्षितिजच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

क्षितिजच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे डोणगाव गावासह संपूर्ण बुलढाणा जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे. जिल्ह्यातील अनेक शाळा, संस्था व संघटनांनी त्याच्या सन्मानासाठी पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे. अत्यंत लहान वयात मिळवलेले हे यश केवळ विक्रम नसून, पालकांसाठी एक दिशादर्शक उदाहरण आहे. मुलांच्या नैसर्गिक कुतूहलाला संधी दिल्यास, योग्य मार्गदर्शन केल्यास आणि प्रेमळ वातावरण दिल्यास असामान्य प्रतिभा नक्कीच फुलू शकतेयाचे जिवंत उदाहरण म्हणजे चिमुकला क्षितिज विशाल बाजड.

# पालिका निवडणुकीच्या इतिहासात पहिल्यांदाच असं घडलं, भाजप उमेदवाराला पोलीस कोठडी

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये बिनविरोध निवडणुकीच्या वादातून मनसेचे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी ६ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. यामध्ये भाजपच्या उमेदवाराचाही समावेश आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीत पहिल्यांदाच असं घडलं आहे, ऐन निवडणुकीत भाजपचा उमेदवार खुनाच्या गुन्ह्यात पोलीस कोठडीत गेला आहे.

सोलापूरमध्ये शुक्रवारी जोशी गल्ली येथे भाजपचे दोन गटात मोठे वाद झाला होता. या वादातून मनसे पदाधिकारी आणि युवासेनेचे शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांची हत्या करण्यात आली होती. शिंदे आणि सरवदे कुटुंबात झालेल्या वादात मनसेचे पदाधिकारी असलेल्या बाळासाहेब सरवदे यांची हत्या झाली होती. या प्रकारणी सोलापूरच्या जेलरोड पोलीस ठाण्यात १५ आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंदवला असून, भाजप उमेदवार शालन शिंदे यांच्यासह ४ जणांना पोलिसांनी तात्काळ अटक केली होती.

आज सोलापुरातील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. पी. मर्ढेकर यांच्या न्यायालयात हजर केलं असता पुढील तपासासाठी पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## भाजप महापालिका निवडणूक हिंदुत्वाच्या मुद्यावर लढणार, निवडणूक प्रभारी संजय कुटेंनी दिले संकेत

**अमरावती/प्रतिनिधी :** भाजप सक्षमपणे ६८ जागांवर निवडणूक लढणार आहे. आम्ही कुठल्याही मित्र पक्षांवर टीका न करता प्रचार करू. भाजप हाच खरा हिंदुत्ववादी पक्ष आहे. हे अमरावतीच्या जनतेला माहित आहे. शहरात मागे अनेक घडामोडी घडल्या. गेल्या काही वर्षांमध्ये झालेले राजकारण पाहता अमरावतीला विकासामध्ये पुढे नेणारा एकमेव भाजप आहे. अमरावतीची हिंदुत्ववादी जनता ही मागे घडलेल्या घटना, भविष्यातील संभाव्य धोके लक्षात घेता भाजपला पूर्ण बहुमत देऊन निवडून आणतील, असा दावा भाजपचे निवडणूक प्रभारी आमदार संजय कुटे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला.

संजय कुटे म्हणाले, भाजपने आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षासाठी नऊ जागा सोडलेल्या असताना या मित्रपक्षाने ४१ उमेदवार दिल्याने निर्माण झालेली कोंडी उमेदवारांच्या माघारीनंतरही सुटू शकली नाही. भाजपने तीन ठिकाणी स्वत:च्या तीन उमेदवारांच्या जागी युवा स्वाभिमानच्या उमेदवारांना पाठिंबा दिला होता. पण, हा पाठिंबा आता काढून घेण्यात आला आहे. भाजप ६८ जागांवर निवडणूक लढवणार असून मित्रपक्षांवर टीका न करता, मनभेद आणि मतभेद न ठेवता आम्ही निवडणुकीला सामोरे जाऊ.

संजय कुटे म्हणाले, महायुती म्हणून चारही घटक पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवण्याची आमची तयारी होती, पण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आधीच वेगळा झाला होता. आम्ही शिवसेना शिंदे गट आणि युवा स्वाभिमान पक्षासोबत युती करण्याची पूर्ण तयारी केली होती. शिंदे गटाला १५ ते १६ आणि युवा स्वाभिमानला ९ जागा देण्याचे मान्य करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुद्द ही संख्या ठरवली होती. पण, जागावाटपाची चर्चा सुरू असताना कोणत्या जागा कोणत्या पक्षांसाठी सोडायच्या यावरून पेच निर्माण झाला. नऊ वर्षांनंतर निवडणूक होत असल्याचे सर्वच मित्र पक्षांवर कार्यकर्त्यांचा दबाव होता. त्यामुळे शिंदे गटासोबत युती होऊ शकली नाही. युवा स्वाभिमानला सोबत ठेवायचे होते. नऊ जागांपैकी सहा जागांवर आम्ही उमेदवार दिला नाही. पण, तरीही युवा स्वाभिमान पक्षाने ४१ जागांवर उमेदवार दिल्याने अडचण निर्माण झाली.

संजय कुटे म्हणाले, आम्ही तीन जागांवर भाजपच्या उमेदवारांची माघार घेण्याची सज्जता ठेवली होती. त्यामुळे युवा स्वाभिमानला नऊ जागा उपलब्ध झाल्या असत्या, पण युवा स्वाभिमानला उर्वरित ३२ जागांवर आपले उमेदवार मागे घेणे शक्य झाले नसते. आम्ही तीन जागांवर युवा स्वाभिमानच्या उमेदवारांना पाठिंब्याचे पत्र दिले, पण ते आता मागे घेतले आहे. पत्रपरिषदेला खासदार डॉ. अनिल बोंडे, शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे उपस्थित होते.

# १८ महिन्यांच्या अथक प्रयत्नानंतर प्रतापनगर चौकातील खांबाचा अडथळा दूर

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** प्रतापनगर चौकातून खामला येथील सोमलवार शाळेकडे जाणाऱ्या डाव्या बाजूच्या वळणावर उभा असलेला विद्युत खांब अखेर हटविण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या दीड वर्षापासून नागरिकांना भेडसावणारा वाहतूक अडथळा दूर झाला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात कोणत्याही यंत्रणेने थेट नकार दिला नसतानाही प्रत्यक्षात निर्णय न होण्याची प्रशासकीय उदासीनता स्पष्टपणे समोर आली होती.

प्रतापनगर चौक हा शहरातील एक महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू असून, खामला परिसर, शाळा-महाविद्यालये तसेच निवासी भागाकडे जाणारी मोठी वाहतूक येथे एकवटते. चौकात असलेला विद्युत खांब डाव्या बाजूने वळण मार्गावरच असल्याने वाहनचालकांना वारंवार अडचणींना सामोरे जावे लागत होते. परिणामी वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि नागरिकांची गैरसोय वाढली होती.

या खांबाच्या हटविण्यासाठी महावितरण (एमएसईडीसीएल), वाहतूक पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी), जिल्हाधिकारी कार्यालय आदी विविध यंत्रणांकडे गेल्या १८ महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. प्रत्येक ठिकाणी बघू, कार्यवाही सुरू आहे, अशी उत्तरे मिळाली; मात्र प्रत्यक्ष कृती मात्र होत नव्हती.

वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या खांब, झाडे, संरचना हटविण्यासाठी उच्च न्यायालयाने न्यायालय मित्र म्हणून ॲड. उज्ज्वल देशपांडे यांची नियुक्ती केल्याचे वृत्त नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. या बातमीच्या आधारे संबंधित नागरिकांनी ॲड. देशपांडे यांची भेट घेऊन आतापर्यंतच्या सर्व पत्रव्यवहाराचे दस्तऐवज सादर केले. ॲड. देशपांडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने छायाचित्रे, तथ्ये, कागदपत्रे आणि अधिकृत पत्रव्यवहार यांची सांगड घालून प्रकरणाची मांडणी केली. त्यांच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे अखेर आज संबंधित विद्युत खांब हटविण्यात आला.

दरम्यान, प्रतापनगर चौकातून खामला येथील सोमलवार शाळेकडे जाणाऱ्या डाव्या बाजूच्या वळण मार्गावर उभा असलेला विद्युत खांब अखेर हटविण्यात आला. या खांबामुळे गेल्या १८ महिन्यांपासून वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका निर्माण होत होता. महावितरण, वाहतूक पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही निर्णय होत नव्हता. उच्च न्यायालयाने ॲमिकस क्युरी म्हणून नियुक्त केलेले ॲड. उज्ज्वल देशपांडे यांनी कागदपत्रे, छायाचित्रे व तथ्यांच्या आधारे प्रभावी पाठपुरावा केल्याने अखेर खांब हटविण्यात आला. या कारवाईमुळे चौकातील वाहतूक अधिक सुरळीत झाली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

प्रतापनगर चौक हा शहरातील एक महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू असून, खामला परिसर, शाळा-महाविद्यालये तसेच निवासी भागाकडे जाणारी मोठी वाहतूक येथे एकवटते. चौकात असलेला विद्युत खांब डाव्या बाजूने वळण मार्गावरच असल्याने वाहनचालकांना वारंवार अडचणींना सामोरे जावे लागत होते. परिणामी वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि नागरिकांची गैरसोय वाढली होती.

# सनसेट पॉईंटला नवे रूप; २ कोटी १३ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहराच्या पर्यटन व सौंदर्यवृद्धीस चालना देणाऱ्या मलकापूर रोडवरील सनसेट पॉईंट येथे २ कोटी १३ लाख रुपये किमतीच्या विकास व सौंदर्यीकरण कामांचे भूमिपूजन आज उत्साहात पार पडले. हा कार्यक्रम बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड तसेच बुलढाणा नगरपालिकेच्या नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष पूजा संजय गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.




या प्रकल्पाअंतर्गत सनसेट पॉईंट परिसराचा सर्वांगीण विकास करण्यात येणार असून आकर्षक रचना, सुबक पायाभूत सुविधा, पर्यटकांसाठी आधुनिक सोयीसुविधा तसेच शहराच्या सौंदर्यात भर घालणारी विविध कामे करण्यात येणार आहेत. या विकासकामांमुळे बुलढाणा शहराला एक नवे सौंदर्यात्मक व विकासात्मक स्वरूप प्राप्त होणार असून पर्यटनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

या भूमिपूजन सोहळ्यास महाराष्ट्र राज्य युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा नगरपरिषद गटनेते युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, जिल्हा वन अधिकारी सरोज गवस, नगरपरिषद मुख्याधिकारी गणेश पांडे, शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत यांच्यासह बुलढाणा नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक, शिवसेना व युवासेना पदाधिकारी, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, शिवसैनिक, नागरिक तसेच वनविभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृत्तविशेष...

### वडगाव गड जि.प. शाळेत आनंद मेळावा; चिमुकल्यांनी गिरवले व्यवहारज्ञानाचे धडे




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव जामोद/प्रतिनिधी :** तालुक्यातील वडगाव गड येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'आनंद मेळावा' उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाची प्रत्यक्ष ओळख करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या मेळाव्याने शाळा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले होते.

सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय वाकोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी पोहे, भेळ, वडापाव, भजी, सँडविच आदी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले होते. पदार्थ विक्रीसोबतच दर ठरवणे, स्वच्छता राखणे आणि ग्राहकांशी संवाद साधणे याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. या उपक्रमाला ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी विद्यार्थ्यांकडून खरेदी करत प्रोत्साहन दिले.

शाळेच्या मुख्याध्यापकांसह शिक्षकवृंदांनी मेळाव्याचे योग्य नियोजन केले होते. 'कमी खर्चात जास्त नफा' व 'ग्राहक समाधान' यासारखी महत्त्वाची सूत्रे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली.

दुपारी ११ वाजेपर्यंत सर्व स्टॉल्सवरील पदार्थांची विक्री पूर्ण झाली. याच आनंद मेळाव्यात वडगाव गड ग्रामपंचायतीकडून शाळेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे देण्याची घोषणा करण्यात आली. याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने ग्रामपंचायतीचे आभार मानण्यात आले. या यशस्वी उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी व पालकांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

### ट्रॅक्टर पलटी होऊन अल्पवयीन चालकाचा मृत्यू, ट्रॅक्टर मालकाविरुद्ध गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/कार्यालय प्रतिनिधी :** डोणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आरेगाव माळ परिसरात ट्रॅक्टर पलटी होऊन अल्पवयीन चालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वाहन चालवण्यास अपात्र असल्याची माहिती असूनही अल्पवयीन मुलाच्या ताब्यात ट्रॅक्टर दिल्याप्रकरणी ट्रॅक्टर मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही घटना २ जानेवारी रोजी रात्री सुमारे १ वाजताच्या सुमारास घडली. एम.एच. २८ टी ८७०९ क्रमांकाचा ट्रॅक्टर अल्पवयीन ऋषिकेश किरण भुतेकर (वय १७ वर्षे ७ महिने) हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत असताना त्याचे नियंत्रण सुटले. ट्रॅक्टर रस्त्याच्या कडेला असलेल्या नालीत घसरून पलटी झाला. या अपघातात ऋषिकेश ट्रॅक्टरखाली दबला गेला. त्याला गंभीर दुखापत झाल्याने तातडीने संभाजीनगर येथे उपचारासाठी नेत असताना रस्त्यातच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी मयताचा नातेवाईक दत्ता पुंजाजी भुतेकर यांनी डोणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, वाहन चालवण्यास परवानगी नसल्याची जाणीव असूनही ट्रॅक्टर मालक पवन अरुण काळे (रा. डोणगाव) याने अल्पवयीन मुलाच्या ताब्यात ट्रॅक्टर दिला होता. डोणगाव पोलिसांनी ट्रॅक्टर मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### खोपोलीतील माजी नगरसेवक मंगेश काळोखे खून प्रकरणात पुण्यातून आरोपी अटकेत; सुपारी घेऊन खून केल्याची कबुली

**पुणे/प्रतिनिधी :** खोपोलीतील माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांच्या खून प्रकरणातील पसार आरोपीला वानवडी पोलिसांनी अटक केली. हडपसरमधील हांडेवाडी भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपी आणि त्याच्याबरोबर असलेल्या दोन मित्रांनी काळोखे यांची सुपारी घेऊन खून केल्याची कबुली दिली.

खालीद खलील कुरेशी (वय २३, रा. सय्यदनगर, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. खोपोलीतील माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांचा खून करण्यात आला होता. हडपसरमधील रामटेकडी औद्योगिक वसाहतीत एका ज्येष्ठ नागरिकाला मारहाण करुन त्यांच्याकडील सोनसाखळी हिसकाविण्यात आली होती.